# *कार्यालयाचे नांव : महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे*

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा पुरविणारे अधिकारी /कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **एकात्मिक बाल विकास सेवा योजना**<br>**१) पुरक पोषण आहार :-**<br>६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना ५०० उष्मांक आणि १२ ते १५ ग्रॅम प्रथिने, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता ६०० उष्मांक आणि १८ ते २० ग्रॅम प्रथिने, तसेच ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील कमी वजनाच्या लाभार्थ्यांना ८०० उष्मांक आणि २० ते २५ ग्रॅम प्रथिनेयुक्त पुरक पोषण आहार दिला जातो. | एका वर्षात ३०० दिवस आहार दिला जातो. आहार पुरवठ्याचे आदेश वर्षभराचे असतात. | अंगणवाडी सेविका | **ग्रामीण :-** बाल विकास प्रकल्प अधिकारी (तालुका)<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) जिल्हा पातळीवर **नागरी :-** बाल विकास प्रकल्प अधिकारी संबधित प्रकल्प<br>उप आयुक्त (आरोग्य व पोषण) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे<br>दूरध्वनी ०२०-२६३३०५१२/५१३ |

<table>
<tr>
<td></td>
<td>
२) लसीकरण
<ul><li>गरोदर माता व स्त्रियांसाठी</li></ul>
१) पहिल्या तिमाहीत आरोग्य केंद्रात नोंद करणे<br>
२) गर्भवतींनी कमीत कमी ३ प्रसुतीपूर्व तपासण्या करणे<br>
३) प्रत्येक भेटीत रक्तदाब तपासून घेणे.<br>
४) प्रत्येक भेटीत वजन करुन घेणे. शेवटच्या ६ महिन्यात गर्भवतीचे वजन महिन्याला १ किलो वाढविणे.<br>
५) धनुर्वात प्रतिबंध लसीचे (TT) २ डोस घेणे. पहिल्या व दुस-या तिमाहीत व एक महिन्याच्या अंतराने दुसरा डोस घेणे.<br>
६) गर्भवतीने तीन महिने रोज एक लोहयुक्त गोळी घेणे कमीत कमी १०० गोळया घेणे.
<ul><li>मुलांसाठी</li></ul>
<table>
<tr><td></td><td></td><td>वयोगट</td></tr>
<tr><td>BCG</td><td>एक डोस</td><td>जन्मत:</td></tr>
<tr><td>DTP पोलिओ</td><td>पहिला डोस</td><td>६ आठवडे</td></tr>
<tr><td>DTP पोलिओ</td><td>दुसरा डोस</td><td>१० आठवडे</td></tr>
<tr><td>DTP पोलिओ</td><td>तिसरा डोस</td><td>१४ आठवडे</td></tr>
<tr><td>गोवर</td><td>एक डोस</td><td>९ महिने पुर्ण</td></tr>
<tr><td>जीवनसत्व अ</td><td>पहिला डोस</td><td></td></tr>
<tr><td>डी.पी.टी.</td><td>बुस्टर डोस</td><td>१८ महिने</td></tr>
<tr><td>पोलिओ</td><td>बुस्टर डोस</td><td></td></tr>
<tr><td>जीवनसत्व अ</td><td>दुसरा डोस</td><td></td></tr>
<tr><td>जीवनसत्व अ</td><td>तिसरा डोस</td><td>२४ महिने</td></tr>
<tr><td>जीवनसत्व अ</td><td>चौथा डोस</td><td>३० महिने</td></tr>
<tr><td>जीवनसत्व अ</td><td>पाचवा डोस</td><td>३६ महिने</td></tr>
</table>
</td>
<td>लाभार्थी<br>० ते ६ वर्षे वयोमानाप्रमाणे, तसेच गर्भवती व स्तनदा माता.</td>
<td>अंगणवाडी सेविका / पर्यवेक्षिका / परिचारिका (ANM) वैद्यकीय अधिकारी (संबधित बीट्स वरील व प्रकल्पातील)</td>
<td>जिल्हा ग्रामीण अधिकारी (ग्रामीणसाठी) वैद्यकीय अधिकारी (महानगरपालिका / नगरपालिका)<br>संबधित बाल विकास प्रकल्प अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)</td>
</tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **३) आरोग्य तपासणी-**<br>० ते ६ वयोगटातील सर्व बालकांची त्रैमासिक आरोग्य तपासणी नियमितपणे होते. तीव्र कमी वजनाच्या बालकांची तपासणी दर महिन्याला होते / आवश्यकतेप्रमाणे गर्भवतीची तपासणी संपूर्ण गर्भावस्थेत ४ वेळा तपासणी होते.<br><br>**जागतिक आरोग्य सघटनेचे नवीन निकष (Child Growth Standards )**<br><br>यापूर्वी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील मुलांना १,२,३ व ४ मध्ये विभाजन करण्यांत येत होते.व श्रेणी ३ व ४ मधील मुलांना अति कुपोषित संवर्गात मोजले जात होते.परंतू शासनाने जागतिक आरोग्य संघटनेच्या नवीन निकषाची (Child Growth Standards )अंमलबजावणी केलेली असून माहे-जून २०१० पासून नविन निकषानुसार श्रेणीकरण करणेंबाबत सुचना दिलेल्या आहेत.सदर पुर्वीच्या निकषापेक्षा थोडे वेगळे असून नविन निकषामध्ये मुलांचे फक्त ३ भागात श्रेणीकरण करण्यात येते.तसेच मुलांच्या आणि मुलींच्या वाढीचे निकष वेगवेगळे असणार आहेत.नवीन निकषामध्ये नवीन तक्त्यावर वजनवाढ मोजल्यानंतर **-३ एसडी म्हणजे तीव्र कमी वजनाची, -२ एसडी म्हणजे मध्यम कमी वजनाची व सर्वसाधारण असे श्रेणीकरण करण्यात आले आहे.** | ० ते ६ वर्षे, मुले, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांची नियमित तपासणी होते. | अंगणवाडी सेविका / पर्यवेक्षिका / परिचारिका (ANM) वैद्यकीय अधिकारी (संबधित बीट्स वरील व प्रकल्पातील) | जिल्हा ग्रामीण अधिकारी (ग्रामीणसाठी ) वैद्यकीय अधिकारी (महानगरपालिका / नगरपालिका)<br>संबधित बाल विकास प्रकल्प अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) |
| | **४) संदर्भ आरोग्य सेवा-**<br>०- ६ वर्षे वयाची मुले, किशोरवयीन मुली, गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता या लाभार्थ्यांना संदर्भ आरोग्य सेवा दिली जाते. आवश्यकतेनुसार विशेष वैद्यकिय परिक्षण व उपचारासाठी वरील लाभार्थ्यांना वैद्यकिय अधिकाऱ्यांकडे संदर्भ देऊन पाठविले जाते. | वैद्यकीय सेवा असल्यामुळे अंगणवाडी सेविकेने निदर्शनास आणून दिल्याबरोबर तात्काळ कार्यवाही केली जाते | अंगणवाडी सेविका, परिचारिका (ANM), वैद्यकीय अधिकारी | पर्यवेक्षिका व बाल विकास प्रकल्प अधिकारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **५) अनौपचारिक शिक्षण-**<br>पुर्व शालेय शिक्षण हा एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या सेवांमधील एक अतिशय महत्वाची सेवा असून ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील बालकांचा सर्वांगीण विकास या सेवेद्वारे साधला जातो. खेळ, गोष्टी, गाणी, बडबड गीते, इत्यादी च्या माध्यमातून अंगणवाडी सेविका मुलांच्या भाषा, सामाजिक, शारिरीक, बौध्दीक व भावनिक विकास घडवित असते. अंगणवाडीमध्ये पुर्व शालेय शिक्षण ३ तास दिले जाते. | नियमितपणे, दररोज | अंगणवाडी सेविका | पर्यवेक्षिका व बाल विकास प्रकल्प अधिकारी |
| | **६) पोषण व आरोग्य शिक्षण -**<br>१८-४५ वर्षे वयोगटाच्या महिलांच्या मासिक दोन बैठका घेणे आवश्यक असते. यामध्ये पोषण आहार व आरोग्य शिक्षण दिले जाते. गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता व तीव्र कुपोषित बालके यांच्याकडे गृहभेटी देऊन पोषण आहार व आरोग्य शिक्षणाबाबत जागरुकता निर्माण केली जाते. | नियमित गृहभेटी दिल्या जातात. | अंगणवाडी सेविका (नियमितपणे) मुख्यसेविका (अधूनमधून) बाल विकास प्रकल्प अधिकारी (नियंत्रणाचा एक भाग म्हणून) | बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी, व बाल विकास प्रकल्प अधिकारी, ग्रामीण उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) जिल्हा परिषद ग्रामीण, उपआयुक्त (संनियंत्रण) |
| | **अ) राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण (सबला ) :-**<br>सबला योजना ही राज्यातील अनुक्रमे बीड, नांदेड, मुंबई, नाशिक, गडचिरोली, बुलढाणा, कोल्हापूर, सातारा,अमरावती,नागपूर आणि गोंदीया या ११ जिल्हयांमध्ये राबविण्यांस मान्यता देण्यांत आलेली आहे<br>१) किशोरी शक्ती योजना KSY व किशोरवयीन मुलींसाठी पोषण कार्यक्रम NPAG या दोन केंद्र पुरस्कृत योजनांचे विलीनीकरण करुन ११ ते १८ या वयोगटातील किशारवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी सबला ( राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण) योजना या केंद्र पुरस्कृत नवीन योजनेची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यांत आलेली आहे.<br>२) सबला योजना ही ११ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींसाठी लागू आहे.<br>३) सदर योजना वर नमूद करण्यांत आल्याप्रमाणे ११ जिल्हयातील २०७ प्रकल्पात लागू आहे.<br>४) केंद्र शासनाचे पोषण आहार योजनेच्या खर्चासंदर्भात प्रति लाभार्थी प्रति दिन रु. ५/- | ११ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींसाठी वर्षातून ३०० दिवस आहार नियमित दिला जातो. | अंगणवाडी सेविका/ पर्यवेक्षिका व संबंधित प्रकल्पाचे बाल विकास प्रकल्प अधिकारी | संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक), नागरी प्रकल्पाचे बाबतीत संबंधित उप आयुक्त (आरोग्य व पोषण) |

<table>
<tr>
<td></td>
<td>
प्रमाणे होणारा खर्च यापैकी जो कमी असेल त्याच्या ५०% केंद्रशासनाकडून अनुज्ञेय आहे व ५०% खर्च राज्यशासनाकडून करण्यांत येणार आहे.<br><br>
ब) " इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना (IGMSY) " या केंद्र पुरस्कृत योजनेची राज्यातील भंडारा व अमरावती या दोन जिल्हयांमध्ये अंमलबजावणी करण्यास दि. ३०/७/२०११ च्या शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात आली आहे.<br>
सदर योजनेचे लाभार्थी गरोदर व स्तनदा माता आहेत.<br>
सदर योजनेंतर्गत दिला जाणारा लाभ पुढील प्रमाणे
<table>
<tr><th>रक्कम हस्तांतरण</th><th>अटी</th><th>रक्कम</th><th>सदर अटी पुर्ततेबाबत खातरजमा खालील कागदपत्रे / अभिलेखांच्या आधारे करण्यात येते</th></tr>
<tr><td>पहिले (दुसऱ्या तिमाहीच्या अखेरीस)</td><td>● अंगणवाडी किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रात गर्भारपणाच्या पहिल्या ४ महिन्यात नांव नोंदणी करणे आवश्यक आहे.<br>● लोह, फोलिक ॲसिड गोळया व टीटीच्या इंजेक्शनसहित किमान एक प्रसूतीपूर्व चाचणी आणि<br>● अंगणवाडीमध्ये किमान एक समुपदेशनास हजेरी आवश्यक<br>● रुग्णालयात प्रसूत होण्यासंबधीचे पॅकेज ज्यामध्ये लवकरात लवकर स्तनपान सुरु करण्याची हमी आहे.</td><td>रु १५००/-</td><td>माता व बालक सुरक्षा कार्ड ज्यावर, नोंदणी अंगणवाडी वा चिकित्साकेंद्रात केल्याचा अंगणवाडी सेविकेने सही केलेला दाखला असावा.</td></tr>
<tr><td>दुसरे (प्रसूतीनंतर ३ महिन्यांनी )</td><td>● प्रसूतीनंतर ३ महिन्यांच्या आत बालक वाढीवर देखरेख करणारे व शिशु व बाल पोषणाच्या पध्दती (Infant & Young Child Feeding ) च्या किमान २</td><td>रु १५००/-</td><td>माता-बालक सुरक्षा कार्ड बालक वाढ तक्ता व लसीकरण रजिस्टर (निर्जीव प्रसूती व बालमृत्युसाठीही उपलब्ध)</td></tr>
</table>
</td>
<td>सदर योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात गरोदरपणाच्या नोंदणी करण्याच्या अटीवर ६ महिने पुर्ण झाल्यानंतर लाभ, त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात बालकाच्या जन्माच्या ३ महिन्यानंतर व तिसऱ्या टप्प्यात बालकाच्या जन्माच्या ६ महिन्यानंतर लाभ</td>
<td>अंगणवाडी सेविका/ पर्यवेक्षिका व संबंधीत प्रकल्पाचे बाल विकास प्रकल्प अधिकारी</td>
<td>संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक), नागरी प्रकल्पाचे बाबतीत संबंधित उप आयुक्त (आरोग्य व पोषण)</td>
</tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | समुपदेशन सत्रास उपस्थित असल्याचा दाखला असणे आवश्यक.<br><br>**तिसरे (प्रसूतीनंतर ६ महिन्यांनी**<br>• ६ महिन्यात निव्वळ स्तनपान तसेच मातेद्वारा प्रमाणित पूरक आहाराची सुरुवात केल्याचा दाखला.<br>• बालकाला OPV व DPT चा तिसरा डोस दिला जाणे.<br>• तिसऱ्या व सहाव्या महिन्यांच्या कालावधीत बालक वाढीवर देखरेख करणारे व IYCF च्या किमान २ समुपदेशन सत्रास उपस्थित असल्याचा दाखला असणे आवश्यक.<br>रु १०००/-<br>स्वयं दाखला (Self Certification) माता बालक सुरक्षा कार्ड, बालक वाढ तक्ता व लसीकरण रजिस्टर | | | |
| | **७) अंगणवाडयांची संख्या, लाभार्थी व इमारत -**<br>**अंगणवाडी केंद्राबाबतची माहिती :**<br>१) मंजूर अगंणवाडी केंद्र :- ९७४६२<br>२) कार्यरत अंगणवाडी केंद्र :- ९५३८०<br>**अंगणवाडी इमारतबाबतची माहिती :**<br>१) स्वतःच्या जागेत मालकीची केंद्र :- ४३५०१<br>२) पर्यायी व्यवस्थेने असलेले (उदा.भाडयाच्या जागेत, समाजमंदिर, ग्रामपंचायत, शासकीय शाळेतील खोल्या, व्हरांडा इ.) केंद्राची संख्या :-५१८७९<br>**अंगणवाडीतील लाभार्थी यांची माहिती :**<br>१) ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील लाभार्थी (बालके) :- ३०,७८,६८५<br>२) ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थी (बालके) :- ३१,७२,७७४<br>३) गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता :- १२४६२५५ | | अंगणवाडी सेविका | **ग्रामीण :-** बाल विकास प्रकल्प अधिकारी (तालुका)<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) जिल्हा पातळीवर<br>**नागरी :-** बाल विकास प्रकल्प अधिकारी संबधित प्रकल्प<br>उप आयुक्त (आरोग्य व पोषण) महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | **निराश्रित महिलांसाठी महिला संस्था शासकीय राज्यगृहे** | | | |
| | १६ ते ६० वर्षे या वयोगटातील निराश्रित, परित्यक्ता, कुमारी माता, बलात्कारीत अथवा संकटग्रस्त महिलांना आश्रय देवून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासकीय महिला राज्यगृहे स्थापन करण्यात आली आहेत. या संस्थामध्ये लाभधारक महिलांना खालीलप्रमाणे सुविधा / सेवा विनामुल्य पुरवून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी प्रयत्न केला जातो.<br>१. लाभधारक महिलांना संस्थेत अन्न, वस्त्र व निवा-याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते.<br>२. लाभधारक महिलांना आवश्यकतेनूसार वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात.<br>३. लाभधारक महिलांना शिवणकला, विणकाम, फाईल तयार करणे अशा प्रकारच्या व्यवसाय प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते.<br>४. अविवाहीत अथवा घटस्फोटीत महिलांच्या विवाहासाठी संस्थेमार्फत प्रयत्न केले जातात.<br>५. लाभधारक महिलांना कायदेविषयक सल्ला व मदत उपलब्ध करून देण्यात येते.<br>६. लाभधारक महिलेसोबत लहान मुले असल्यास त्या मुलांनाही संस्थेत प्रवेश दिला जातो.<br>७. लाभधारक महिला संस्थेत ३० दिवसापेक्षा अधिक काळ राहील्यास तिला वरील सुविधेच्या व्यतिरिक्त सुधारीत माहेर योजनेतंर्गत दरमहा रु.२५०/- इतके रोख अनुदान देण्यात येते व सदर महिले बरोबर लहान मुले असल्यास पहिल्या मुलासाठी दरमहा रु.१५०/- व दुस-या मुलासाठी रु.१००/- इतके ज्यादा रोख अनुदान देण्यात येते. सदरचे अनुदान एक वर्षापर्यत देण्यांत येते.<br>८. लाभधारकास दरमहा अनुज्ञेय अनुदानापैकी ५०% अनुदान | या योजनेतंर्गत कार्यरत असलेल्या संस्थेमध्ये लाभधारक महिला पोलीसामार्फत, सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत किंवा स्वेच्छेने दाखल होतात.<br>१६ ते ६० वयोगटातील निराश्रित परित्यक्ता, कुमारी माता, बलात्कारीत अथवा संकटग्रस्त महिलां दाखल झाल्यावर त्यांना त्वरीत सेवा पुरविल्या जातात. | संबंधित संस्थेचे अधिक्षक | संबंधित जिल्हयाचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रत्येक महिन्याच्या शेवटी रोखीने व उर्वरित ५०% अनुदान वर्षाच्या शेवटी किंवा तत्पूर्वी संस्था सोडल्यास संस्था सोडतांना ठोक रक्कम एकत्रितपणे देण्यात येते.<br>९. जे लाभधारक सहा महिन्यापेक्षा अधिक काळ संस्थेत राहतील त्यांनी सहा महिन्याच्या कालावधीनंतर दरमहा रू. ५०/- इतकी रक्कम संस्थेला द्यावी व तितकीच रक्कम संस्थेने त्यात जमा करून तो निधी संस्थेच्या अखत्यारीत ठेवून लाभार्थीच्या तातडीच्या आकस्मिक खर्चासाठी वापरण्यात येतो.<br>१०. लाभधारक महिला ९० दिवसापेक्षा जास्त कालावधी संस्थेत राहील्यास, तिला रोजगारासाठी उपयुक्त असे प्रशिक्षण संस्थेत अथवा शासनमान्य संस्थेमधून देण्यात येते.<br>**टिप:-** राज्यगृह या योजनेतंर्गत कार्यान्वीत असलेल्या संस्थाची यादी व विहीत अर्जाचा नमुना संबधित जिल्हयाच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामध्ये व आयुक्तालयाच्या www.commisionerate.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. | | | |
| **३.** | **संरक्षण गृहे** | | | |
| | अनैतिक व्यापार (प्रतिबंध ) अधिनियम १९५६ अंतर्गत अनैतिक व्यापारातून पोलीसांमार्फत सोडवून आणलेल्या महिलांचे संरक्षण व पुनर्वसन करण्यासाठी संरक्षणगृहे चालविण्यात येतात. या संस्थामध्ये महिलांना खालीलप्रमाणे सुविधा विनामुल्य पुरविण्यात येतात.<br>१. लाभधारक महिलांना संस्थेत अन्न, वस्त्र व निवा-याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते.<br>२. लाभधारक महिलांना आवश्यकतेनूसार वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात.<br>३. संस्थेत दाखल झालेल्या महिलांच्या आई - वडिलांचा / नातेवाईकांचा शोध घेवून त्यांना त्यांच्या घरी परत पाठविण्यात येते. | पोलीसांनी धाडी टाकल्यानंतर अनैतिक व्यापारातून सुटका केलेल्या महिलां संस्थेत दाखल झाल्यावर त्वरित सेवा पुरविल्या जातात. तसेच कोर्टाच्या आदेशाप्रमाणे त्या तेथे राहातात. | संबंधित संस्थेच्या अधिक्षका | संबंधित जिल्हयाचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ४. इच्छूक महिलांच्या विवाहासाठी व रोजगार उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करण्यात येतात.<br>५. लाभधारक महिलांना कायदेविषयक सल्ला व मदत उपलब्ध करून देण्यात येते.<br>६. लाभधारक महिलांना वास्तव्याच्या कालावधीत शिक्षण व प्रशिक्षण देण्यात येते.<br>७. संरक्षणगृहातील महिलांनाही राज्यगृहातील लाभधारकाप्रमाणे सुधारीत माहेर योजनेतंर्गत असणारे रोख अनुदान देण्यात येते.<br>**टिप:-** संरक्षणगृहे या योजनेतंर्गत कार्यान्वीत असलेल्या संस्थाची यादी व विहीत अर्जाचा नमुना सबंधित जिल्हयाच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामध्ये व आयुक्तालयाच्या www.commisionerate.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. | | | |
| **४.** | **निराश्रीत महिलांसाठी आधारगृह योजना (स्वयंसेवी संस्थेमार्फत)** | | | |
| | १६ ते ६० वर्षे या वयोगटातील निराश्रित, परित्यक्ता, कुमारी माता, बलात्कारीत अथवा संकटग्रस्त महिलांना आश्रय देवून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी स्वयंसेवी संस्थामार्फत आधारगृहे चालविली जातात. या संस्थामध्ये लाभधारक महिलांना खालीलप्रमाणे सुविधा / सेवा विनामुल्य पुरवून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी प्रयत्न केला जातो.<br>१. लाभधारक महिलांना संस्थेत अन्न, वस्त्र व निवा-याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते.<br>२. लाभधारक महिलांना आवश्यकतेनूसार वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात.<br>३. लाभधारक महिलांना शिवणकला, विणकाम, फाईल तयार करणे अशा प्रकारच्या व्यवसाय प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. | या संस्थेत पोलीसामार्फत, सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत किंवा स्वेच्छेने १६ ते ६० वर्षे वयोगटातील निराश्रित परित्यक्ता, कुमारी माता, बलात्कारिता व संकटग्रस्त महिलां दाखल झाल्यावर त्वरित सेवा पुरविल्या जातात.<br>**नवीन संस्था मान्यतेसाठी :**<br>स्वयंसेवी संस्थांनी या योजने अंतर्गत संस्था चालविण्यासाठी जिल्हा महिला व बाल विक ास अधिकारी याच्याकडे अर्ज केल्या नंतर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | १. संबंधित संस्थेचे अधिक्षक<br><br>२. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी. | संबंधित जिल्हयाचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी<br><br>२. आयुक्त, महिला व बाल विकास, २८ राणीचा बाग, कॅम्प पुणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ४. अविवाहीत अथवा घटस्फोटीत महिलांच्या विवाहासाठी संस्थेमार्फत प्रयत्न केले जातात.<br>५. लाभधारक महिलांना कायदेविषयक सल्ला व मदत उपलब्ध करून देण्यात येते.<br>६. लाभधारक महिलेसोबत लहान मुले असल्यास त्या मुलांनाही संस्थेत प्रवेश दिला जातो.<br>७. लाभधारक महिला संस्थेत ३० दिवसापेक्षा अधिक काळ राहील्यास तीला वरील सुविधेच्या व्यतिरिक्त सुधारीत माहेर योजनेतंर्गत दरमहा रु.२५०/- इतके रोख अनुदान देण्यात येते व सदर महिले बरोबर लहान मुले असल्यास पहिल्या मुलासाठी दरमहा रु.१५०/- व दुस-या मुलासाठी रु.१००/- इतके ज्यादा रोख अनुदान देण्यात येते. सदरचे अनुदान एक वर्षापर्यत देण्यांत येते.<br>**टिपः-** आधारगृह या योजनेतंर्गत कार्यान्वीत असलेल्या संस्थाची यादी व विहीत अर्जाचा नमुना सबंधित जिल्हयाच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामध्ये व आयुक्तालयाच्या www.commisionerate.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. | यांनी तीन आठवडयात संस्थेची तपासणी करुन आयुक्तालयास शिफारसीसह प्रस्ताव सादर करतील. प्राप्त प्रस्तावाची आयुक्तालयाकडून छाननी करुन प्रस्ताव परिपूर्ण असल्यास व अनुदान उपलब्धता व जिल्हयात योजनेची आवश्यकता असल्यास तीन आठवडयात प्रस्ताव शासनास सादर केला जाईल. अनुदान उपलब्ध नसल्यास व जिल्हयात योजनेची आवश्यकता नसल्यास प्रस्ताव त्वरीत फेटाळला जाईल. | | |
| ५. | **शुभमंगल सामूहिक / नोंदणीकृत विवाह योजना** | | | |
| | महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयातील शेतक-यांच्या / शेतमजूरांच्या मुलींच्या सामुहिक विवाहासाठी शुभमंगल सामुहिक विवाह योजना राबविण्यात येते.<br>या योजनेतंर्गत स्वयंसेवी संस्था किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मार्फत सामुहिक सोहळयाचे आयोजन करण्यात येईल. सामुहिक विवाह राबविणा-या स्वयंसेवी संस्थाना प्रत्येक जोडप्यामागे रु.२०००/- एवढे प्रोत्साहनात्मक अनुदान विवाह सोहळा आयोजन व तद्नुषंगिक खर्चासाठी देण्यात येते व प्रत्येक जोडप्यास रु.१०,०००/- वधुच्या आईच्या नावाने आई हयात नसल्यास वडीलांच्या नावाने, आई-वडील दोघेही हयात नसल्यास | **संस्थेस सोहळा आयोजनासाठी**<br>संस्थेने सामुहिक विवाह सोहळयाची तारिख निश्चित करुन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कडे परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्यावर निधीच्या उपलब्धतेनुसार सात दिवसांत मंजूरी देण्यात येईल.<br>**विवाहासाठी :**<br>सामुहिक विवाहाची तारीख जाहिर झाल्यानंतर अर्ज संबंधित संस्थेमार्फत | संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी<br><br>संबंधित स्वयंसेवी संस्था | आयुक्त, महिला व बाल विकास., २८ राणीचा बाग कॅम्प पुणे<br><br>संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वधूच्या नावाने देण्यात येते. सोहळयात किमान ५ व कमाल १०० जोडप्यांचा समावेश असावा. एका संस्थेस वर्षात फक्त दोनदा सामुहिक विवाह समारंभ आयोजित करता येतात. वार्षिक रू. १.०० लाखापेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाला अनुदान अनुज्ञेय नाही.<br>दिनांक ३० सप्टेंबर, २०११ च्या शासन निर्णयानूसार या योजनेतंर्गत जे जोडपे सामुहिक सोहळयात सहभागी न होता, सरळ विवाह नोंदणी कार्यालयात जावून नोंदणीकृत विवाह करतील. त्यांना ही रू. १०,०००/- इतके अनुदान देण्यात येते. | संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे करण्यांत यावा. अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत अर्ज परिपूर्ण असल्यास त्यावर कार्यवाही करण्यांत येईल. विवाह फक्त नोदणीकृत असणे आवश्यक आहे. | | |
| ६. | **निराश्रित विधवा महिलांच्या मुलींसाठी विवाह अनुदान** | | | |
| | दारिद्रय रेषेखालील निराधार विधवा महिलेला तिच्या पहिल्या मुलींच्या लग्नासाठी अर्थसहाय्य दिले जाते.<br>विवाह झाल्यापासून ९० दिवसांचे आत विहित कागदपत्रांसह अर्ज केल्यास एकदाच रु.२०००/- विवाहासाठी सहाय्यक अनुदान देण्यांत येते. | शहरी भागाकरीता जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी व ग्रामीण भागाकरीता उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण ) जिल्हा परिषद यांचे कार्यालयास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्ताव परिपूर्ण असल्यास व अनुदान उपलब्धतेच्या अधिन राहून १ महिन्याच्या आत अंतिम निर्णय घेण्यांत येईल. प्रस्तावात त्रृटी असल्यास त्रृटीपूर्ततेस्तव संबंधितांना १५ दिवसांत प्रस्ताव परत करण्यांत येईल. | **शहरी भागासाठी**<br>संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी<br>**ग्रामीण भागासाठी**<br>संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकारी,<br>(बाल विकास )<br>(जिल्हा परिषद) | आयुक्त, महिला व बाल विकास, २८ राणीचा बाग कॅम्प पुणे<br><br>संबधित जिल्हयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद |
| ७. | **हुंडा पध्दतीचे निर्मूलन** | | | |
| | हुंडा पध्दतीचे समाजातून उच्चाटन करण्यासाठी प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करणे.<br>हुंडा पध्दती नष्ट करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा दक्षता समितीची स्थापना करण्यात आलेली | सदरची समिती शासनानेच गठित केली असल्यामुळे तीचे कार्य अव्याहतपणे चालू असते. | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | संबधित जिल्हाधिकारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आहे.<br>ही समिती १. हुंडा पध्दतीच्या दुष्परिणामाबददल जनमत जागृत करण्यासाठी वृत्तपत्र, रेडिओ, दुरदर्शन, कार्यसत्र अभ्यास, शिबिर , पत्रक वाटप इत्यादी विविध प्रकार माध्यमातून प्रशिक्षण. २. हुंडा विरोधी कार्यक्रम कलापथक पथनाटय, सभा, प्रदर्शने इत्यादी कार्यक्रम योजना. ३. हुंडयामुळे अत्याचार पिडित आणि दुर्घटनाग्रस्त झालेल्या प्रकरणांची अनौपचारीक चौकशी आणि तदविषयक माहिती गोळा करणे. ४. हुंडा बळी महिलांचे पुरर्वसन विषयक विधायक सुचना करणे. ५. कायदेविषयक मदतीची तरतूद करणे. ६. इतर अनिष्ट प्रथेने पिडित झालेल्या स्त्रियांना सहाय्य देणेविषयी सुचना करणे. अशा प्रकारच्या सेवा पुरविते.<br>हुंडाग्रस्त महिलेने पोलिस किंवा महिला हेल्प लाईन, हुंडा प्रतिबंध अधिकारी व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय यांचेशी संपर्क साधावा. | | | |
| ८. | **देवदासींच्या मुला- मुलीं करिता वसतिगृह सुरु करणे देवदासींच्या मुलांनी शैक्षणिक सुविधांचा लाभ घ्यावा यासाठी निवासाची सोय करणे** | | | |
| | देवदासींच्या शिक्षण प्रशिक्षण घेणा-या मुलांना शिक्षण, अन्न, वस्त्र, निवारा वगैरे सेवा प्रशिक्षण पुरवून पुनर्वसनासाठी विनामुल्य प्रयत्न केला जातो. स्वयंसेवी संस्थेस वसतिगृह चालविण्यासाठी दरमहा दरडोई रु.९५०/- प्रमाणे लाभार्थीच्या उपस्थितीवर अनुदान देण्यांत येते. या मुलांसाठी खालील ठिकाणी वसतिगृहे कार्यान्वीत आहेत.<br>**१. भगिनी निवेदिता प्रतिष्ठान संचलीत देवदासी मुलींचे वसतिगृह जत ता. जत जि. सांगली**<br>**२. देवदासी मुलांचे वसतिगृह गडहिंग्लज ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर** | **<u>संस्थेतील प्रवेशासाठी :</u>**<br>संस्थेचे अधिक्षक यांच्याकडे अर्ज व आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर रिक्त जागा असल्यास त्वरीत प्रवेश दिला जातो.<br>**<u>संस्था मान्यतेसाठी :</u>**<br>१.जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कार्यालयात प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्ताव परिपूर्ण असल्यास , योजनेची जिल्हयात आवश्यकता असल्यास | १.संबंधित वसतिगृहाचे अधिक्षक<br><br>२. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | संबधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी<br><br>आयुक्त, महिला व बाल विकास, २८ राणीचा बाग कॅम्प पुणे-१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अनुदानउपलब्ध तेच्या आधारे १ महिन्याच्या आत अंतिम निर्णय घेण्यांत येईल. प्रस्तावात त्रृटी असल्यास १५ दिवसात त्रृटी पूर्तते साठी प्रस्ताव परत करण्यांत येईल.<br>नवीन वसतिगृहांची आवश्यकता नसल्याने प्रस्ताव स्विकारण्यांत येत नाही. | | |
| ९. | **देवदासी प्रथा नष्ट करण्यासाठी प्रबोधन कार्य करणा-या स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहनपर अनुदान.** | | | |
| | देवदासी प्रथा समाजातून नष्ट करण्यासाठी समाज प्रबोधानाचे कार्य करणा-या स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन देणे. रु.१००००/- प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यांत येते. | सदरचे अनुदान देवदासी अभ्यास गटाने देवदासीचे प्राबल्य असलेले जे दहा जिल्हे नमुद केले आहेत त्या जिल्हयातून प्राप्त प्रस्तावासासाठी दिले जाते.<br>प्रस्ताव सादर केल्यानंतर ४५ दिवसांत तपासणी अहवाल व अभिप्रायासह जिल्हा महिलाव बाल विकास अधिकारी प्रस्ताव आयुक्तालयाकडे पाठवतील. आयुक्तालय स्तरावर निधीची उपलब्धता पाहून ४५ दिवसात मंजूरीबाबत निर्णय घेण्यात येईल. | संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | आयुक्त, महिला व बाल विकास, २८ राणीचा बाग कॅम्प पुणे |
| १० | **महिला समुपदेशन केंद्र (राज्य शासन योजना)** | | | |
| | महिलांवर होणा-या गुन्हयांना आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने प्रामुख्याने ज्या सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने महिलांवर होणा-या अत्याचारासाठी महिला समुपदेशन केंद्र चालविली जात होती. काही ठिकाणी या धर्तीवर महिला समुपदेशन | **संस्था मान्यतेसाठी**<br>संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रस्तावाची छाननी करुन आवश्यक त्या | संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | सदस्य सचिव महिला राज्य आयोग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | चालविण्याचा निर्णय कृतिदलाने घेतला त्यानुसार जिल्हास्तरावर पोलिस विभागाच्या क्षेत्रात स्वयंसेवी संस्थांमार्फत अत्याचारीत महिलांना समुपदेशन करण्याचे कार्य केले जाते. सदर केंद्र चालविण्याकरीता स्वयंसेवी संस्थांना रु २.३०,३६६ इतके अनुदान देण्यात येते. | प्रमाणपत्रासह प्रस्ताव १ महिन्यात महिला राज्य आयोगास सादर करावा. प्रस्तावात त्रृटी असल्यास संबंधितांना त्रृटी पूर्ततेसाठी प्रस्ताव परत करावा. महिला राज्य आयोगास परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर राज्यातील सर्व प्रस्तावाची छाननी करुन प्रकल्प सुकाणु समितीस सादर केले जातात. समितीने निर्णय घेतल्यानंतर योजना मान्यतेचे आदेश निर्गमीत केले जातात. सदर समितीच्या बैठकी चा दिनांक मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने निश्‍चित करण्यात येतो. | | |
| ११ | **नोकरी करणा-या महिलांसाठी वसतिगृह (केंद्र शासन योजना)** | | | |
| | निवास स्थानापासून इतर शहरात नोकरी करणा-या विवाहीत, अविवाहीत, घटस्पोटीत, विधवा, महिलांना या वसतिगृहात प्रवेश देण्यात येतो. तसेच महिलेसोबत ७ वर्षाच्या आतील मुलास देखिल वसतिगृहात ठेवण्यात येते.<br>स्वयंसेवी संस्थेस सार्वजनिक जागेवर वसतिगृहाच्या इमारत बांधकामासाठी अनुदान देण्यात येते. संस्था भाडयाने इमारत घेवून योजनेची अंमलबजावणी करु शकते.<br>सुधारित योजनेनूसार मेट्रोपॉलिटन शहरासाठी जास्तीत जास्त रू. ३०,०००/- व इतर शहरांसाठी जास्तीत जास्त रू. २५,०००/- ऐवढे मासिक उत्पन्न असलेल्या महिलांना या सुविधेचा लाभ घेता येईल. तसेच महिलेच्या मासिक वेतनाच्या प्रमाणात पुढीलप्रमाणे शुल्क आकारण्यात येते. सिंगल बेडरूमसाठी मासिक पगाराच्या १५%, डबल बेडरूमसाठी मासिक पगाराच्या १०%, डॉरमेटरीसाठी मासिक पगाराच्या ७.५% भाडे आकारण्यात येते. | **<u>संस्थेत प्रवेशासाठी :</u>**<br>अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर जागा उपलब्ध असल्यास त्वरीत.<br>**<u>संस्था मान्यतेसाठी :</u>**<br>जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करुन परिपूर्ण प्रस्ताव छाननी समितीपुढे ठेवण्यांत येतात व त्या नंतर छाननी समितीने मंजूरी दिलेले प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यांत येतात. | १. संबंधित संस्थेचे अधिक्षक<br><br><br><br><br>२. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी<br><br><br><br><br>३. केंद्र शासन | संबधित जिल्हयाचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी<br><br><br><br>आयुक्त, महिला व बाल विकास, २८ राणीचा बाग कॅम्प पुणे<br><br><br><br>सचिव, महिला व बाल विकास, मंत्रालय, नवी दिल्ली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **टिप:** नोकरी करणा-या महिलांच्या वसतिगृहांची यादी व विहित अर्जाचा नमूना सबंधित जिल्हयांच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाकडे व आयुक्तालयाच्या www.commisionerate.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. | | | |
| १३. | **स्टेप (केंद्र शासनाची योजना)** | | | |
| | आर्थिकदृष्टया दुर्बल महिलांमधील कौशल्य वाढवून त्यांची व्यावसायिकदृष्टया उत्पादकता वाढविणे, जेणेकरून त्या आर्थिकदृष्टया स्वतःच्या पायावर उभ्या राहून सक्षम होऊ शकतील या योजनेतंर्गत महिलांना पशुपालन, शेती, डेअरी, मत्स्य व्यवसाय, हस्तकला, खादी ग्रामोद्योग, रेशमी किडयांचे पालन, सामाजिक वनीकरण, पडीक जमिनीचा विकास, स्थानिकरित्या मान्यता दिलेला कोणताही व्यवसाय इ. प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येते. असा हा सात्विक उपक्रम स्वयंसेवी संस्थामार्फत राबविण्यात येतो. महिलांना प्रशिक्षण सुविधा, कर्मचारी वर्ग, कच्चा माल, व पुरक सेवा उपलब्ध करण्यासाठी स्वयंसेवी संस्थेला प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ९०% रक्कम अनुदान म्हणून देण्यात येते. उर्वरीत १० % रक्कम स्वयंसेवी संस्थेने उभारावयाची आहे. सदरचे अनुदान दोन हप्त्यात देण्यांत येते. एका प्रकल्पामध्ये किमान २०० व कमाल १००० महिला असणे आवश्यक आहे. प्रशिक्षणासाठी गरजू महिलेने सबंधित स्वयंसेवी संस्थेशी संपर्क साधावा.<br>**टिप:** स्टेप योजनेतंर्गत कार्यरत संस्थाची यादी विहित अर्जाचा नमूना सबंधित जिल्हयांच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाकडे व आयुक्तालयाच्या www.commisionerate.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. | **प्रवेशासाठी :**<br>आवश्यक त्या कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर जागा उपलब्ध असल्यास आणि योजना मंजुर झाल्यास त्वरित प्रवेश देण्यात येतो.<br>**संस्था मान्यतेसाठी :**<br>जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करुन परिपूर्ण प्रस्ताव छाननी समितीपुढे ठेवण्यांत येतात व त्या नंतर छाननी समितीने मंजूरी दिलेले प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यांत येतात.. | १. संबंधित संस्थेचे अधिक्षक<br><br>२. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी<br><br>३. केंद्र शासन | संबधित जिल्हयाचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी<br><br>आयुक्त, महिला व बाल विकास, २८ राणीचा बाग कॅम्प पुणे<br><br>सचिव महिला व बाल विकास मंत्रालय नवी दिल्ली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | **स्वाधार (केंद्र शासनाची योजना)** | | | |
| | निराधार, निराश्रीत महिला व ज्या महिलेला कौटुंबिक आधार नाही अशी महिला, मानसिक दृष्टया कमकुवत महिला, एड्सग्रस्त महिला, अशा महिलांना निवारा , अन्न वस्त्र कपडे देणे , समुपदेशन करणे, शिक्षणाद्वारे त्यांची सामाजिक व आर्थिक उन्नती करणे, न्यायिक व इतर आधार देणे, यासाठी स्वयंसेवी संस्थांना प्रकल्प राबविण्यासाठी केंद्र शासनाकडून स्वाधार योजनेअंतर्गत अनुदान दिले जाते. या योजनेअंतर्गत राज्यात हेल्पलाईन कार्यरत आहेत. सदर योजना राज्य शासन व स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून राबविली जाते.<br>गरजू महिला प्रवेशासाठी संबंधित संस्था, व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधू शकतात.<br>**टिप:** स्वाधार योजनेतंर्गत कार्यरत संस्थाची यादी व विहित अर्जाचा नमूना सबंधित जिल्हयांच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाकडे व आयुक्तालयाच्या www.commisionerate.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. | **संस्था मान्यतेसाठी :**<br>जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करुन परिपूर्ण प्रस्ताव छाननी समितीपुढे ठेवण्यांत येतात व त्या नंतर छाननी समितीने मंजूरी दिलेले प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यांत येतात. | १. संबंधित संस्थेचे अधिक्षक<br><br>२. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी<br><br>३. केंद्र शासन | संबधित जिल्हयाचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी<br><br>आयुक्त, महिला व बाल विकास., २८ राणीचा बाग कॅम्प पुणे<br><br>सचिव महिला व बाल विकास मंत्रालय नवी दिल्ली |
| १५. | **उज्वला (केंद्र शासन योजना)** | | | |
| | उज्वला ही केंद्र शासनाची योजना असून या योजनेअंतर्गत प्रामुख्याने पाच घटक आहेत ते पुढील प्रमाणे.<br>१.प्रतिबंध , २. सुटका, ३. पुनर्वसन, ४. पुनएकात्मिकीकरण, ५. मायदेशी पाठविणे<br>लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या, वेश्या व्यवसायातून पोलिसांनी सुटका केलेल्या, लालबत्ती विभागातील स्त्रिया व मुलींचे स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून संगोपन, शिक्षण, प्रशिक्षण देवून पुनर्वसन करण्यासाठी उज्वला ही योजना कार्यान्वीत केलेली असून या योजनेतंर्गत अ दर्जाच्या शहरासाठी स्वयंसेवी संस्थेस रूपये | **प्रवेशासाठी :**<br>अनैतिक व्यवसायातून सुटका करण्यात आलेल्या महिला/मुली यांना सक्षम प्राधिकरणाच्या आदेशान्वये प्रवेश दिला जातो. स्वेच्छेने सुध्दा प्रवेश देण्यात येतो.<br><br>**संस्था मान्यतेसाठी :** | १. संबंधित संस्थेचे अधिक्षक आणि महिला असतील तर न्यायालय आणि मुली असतील तर संबधित बाल कल्याण समिती<br><br>२. जिल्हा महिला व बाल | संबधित जिल्हयाचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी<br><br>आयुक्त, महिला व बाल |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २२,३६,०००/- व ब दर्जाच्या शहरासाठी रूपये २१,७६,०००/- इतके सहाय्यक अनुदान देण्यात येत.<br>**टिप:** उज्वला योजनेतंर्गत कार्यरत संस्थांची यादी व विहित अर्जाचा नमूना सबंधित जिल्हयांच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाकडे व आयुक्तालयाच्या www.commisionerate.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करुन परिपूर्ण प्रस्ताव छाननी समितीपुढे ठेवण्यांत येतात व त्या नंतर छाननी समितीने मंजूरी दिलेले प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यांत येतात. | विकास अधिकारी<br><br>३. केंद्र शासन | विकास, २८ राणीचा बाग कॅम्प पुणे<br><br>सचिव महिला व बाल विकास मंत्रालय नवी दिल्ली |
| **१६.** | **कौंटुबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५** | | | |
| | कौंटुबिक हिंसाचार म्हणजे एकाच घरात राहणारा पुरुष, नातेवाईकांनी, स्त्री ला मारहाण, शिवीगाळ करणे, हुंडयासाठी धमकावणे, घरातून हाकलून देणे, नशेसाठी स्त्री कडून मारहाण करुन पैसे घेणे, स्त्री ला आवश्यक गरजांपासून वंचित ठेवणे, लैंगिक अत्याचार, शाब्दीक व भावनिक गैरवर्तन करणे, आर्थिक अत्याचार करणे, अशी पिडीत महिला स्थानिक क्षेत्रात नियुक्त केलेल्या संरक्षण अधिकारी यांचेशी संपर्क साधून विहित नमुन्यातील अर्ज भरुन तो न्यायालयास सादर करु शकते. न्यायालय प्रकरणानुसार नोटीस बजावणे, समुपदेशन करणे, विभागून घरात राहण्याचा हक्क देणे, पोलीस संरक्षण देणे, निवास देणे, आर्थिक सहाय्य देणे, मुलांचा ताबा आदेश नुकसान भरपाई आदेश व आवश्यक सेवा पुरविणे या स्वरुपाचा आदेश देते.<br>**टिप:** जिल्हयामध्ये नियुक्त केलेल्या संरक्षण अधिका-यांची यादी व क्षेत्र सबंधित जिल्हयांच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाकडे व आयुक्तालयाच्या www.commisionerate.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. | न्यायालयात अर्ज दाखल केल्यानंतर पहिल्या सुनावणीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या कालावधीत प्रकरण निकालात काढण्यात येते. | १. संरक्षण अधिकारी<br><br>२. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | संबंधित न्यायालयाचे न्यायाधिश |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७. | **निरीक्षण गृह/बालगृह** | | | |
| | बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार पोलिसांच्या मार्फत ताब्यात घेतलेले विधी संघर्षित बालकास बाल न्याय मंडळांच्या आदेशाने अंतिम आदेश निर्गमीत करेपर्यत निरिक्षण गृहात ठेवण्यात येते. तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना बालकल्याण समितीच्या आदेशानुसार निरिक्षणगृह/बालगृहात दाखल करण्यात येते. बालकांच्या संस्थेतील वास्तव्य कालावधीत त्यांचे संरक्षण, अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सेवा, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच त्यांच्या पालकांचा शोध घेऊन पुनर्वसन करण्यात येते.<br>सदर योजना राबविणेसाठी स्वयंसेवी संस्थेस योजनेच्या आकृत्तीबंधानुसार मान्य कर्मचारी वेतनावर १००% सहाय्यक अनुदान देण्यात येते. एक्सकॉर्ट खर्च १००%, प्रति प्रवेशित आणि दरमहा रु.६३५ /- परिरक्षणासाठी सहाय्यक अनुदान स्वयंसेवी संस्थेस अदा केले जाते. तसेच शासकिय निरिक्षणगृहांचा १००% खर्च शासनामार्फत केला जातो. सदर योजना शासन तसेच स्वयंसेवी संस्थामार्फत राबविण्यात येते<br>सदर सर्व संस्थांनी बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारित अधिनियम २००६ च्या कलम ३४ (३) नूसार नोंदणी प्रमाणपत्र घेणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. बालगृह/ निरीक्षण गृहांची यादी व विहित अर्जाचा नमूना संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे व आयुक्तालयाच्या www.commisionerate.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. | **<u>संस्था प्रवेशासाठी :</u>**<br>बाल न्याय मंडळ किंवा बाल कल्याण समिती यांचे आदेशानंतर तात्काळ दाखल करण्यात येते.<br><br>**<u>संस्था मान्यतेसाठी :</u>**<br>संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे योजनेच्या मान्यतेसाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्या प्रस्तावांची छाननी करुन परिपुर्ण प्रस्ताव योग्य त्या शिफारशीसह आयुक्तालयास सादर केले जातात. त्यानंतर जिल्हयांच्या आवश्यकतेनुसार आणि उपलब्ध तरतुदीच्या अधिन राहून स्वयंसेवी संस्थेस अनुदान तत्वावर मान्यता देण्याचा निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात येतो. | संबंधीत संस्थेचे अधिक्षक/परिविक्षा अधिकारी आणि बाल न्याय मंडळ/बाल कल्याण समिती<br><br>जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी / राज्य सल्लागार मंडळ,<br>व्दारा आयुक्त, महिला व बाल विकास ,२८- राणीचा बाग, म.रा. पुणे-१<br><br>आयुक्त, महिला व बाल विकास, २८-राणीचा बाग म.रा. पुणे-१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **१८.** | **बालगृह** | | | |
| | बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना बालकल्याण समितीच्या आदेशानुसार बालगृहात ठेवण्यांत येऊन त्यांच्या संस्थेतील वास्तव्य कालावधीत त्यांचे संरक्षण, अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सेवा, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देणे. तसेच त्यांचे पालकांचा शोध घेणे व पुनर्वसन करणे.<br>स्वयंसेवी संस्थेस प्रति प्रवेशित दरमहा दरडोई दरमहा रु.९५०/- परिरक्षणासाठी सहाय्यक अनुदान संस्थेस दिले जाते. त्यामध्ये रु.६३५/- परिपोषण व रु.३१५/- प्रशासकीय खर्चावर सहाय्यक अनुदान मंजूर करण्यांत येते.<br>मतिमंद व एचआयव्ही बाधित मुलांचे स्वयंसेवी बालगृहाकरिता रुपये ११४०/- सहाय्यक अनुदान संस्थेस दिले जाते. त्यामध्ये रु.८२५/- परिपोषण व रु.३१५/- प्रशासकीय खर्चावर अनुदान मंजूर करण्यांत येते. तसेच शासकीय बालगृगृहांचा १००% खर्च शासनामार्फत केला जातो. सदर योजना शासन तसेच स्वयंसेवी संस्थामार्फत राबविण्यात येते<br>**बालसदन, बालकाश्रम व अनाथालय या योजनेअंर्गत कार्यरत निवासी संस्थांना बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० च्या कलम ३४ (१) अन्वये सर्व संस्थाना बालगृह म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.**<br>**सदर सर्व संस्थांनी बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारित अधिनियम २००६ च्या कलम ३४ (३) नूसार नोंदणी प्रमाणपत्र घेणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.**<br>काळजी व सरंक्षणाची गरज असलेल्या बालकांना बालगृहामध्ये प्रवेश घ्यावयाचा असल्यास बाल कल्याण समिती, विशेष बाल पोलीस पथके, लोक, चाईल्ड लाईन, स्वयंसेवी संधटना, समाजासेवक व बालक स्वत:. | **संस्था प्रवेशासाठी :**<br>बाल कल्याण समिती यांचे आदेशानंतर तात्काळ दाखल करण्यात येते.<br><br>**संस्था मान्यतेसाठी :**<br>संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे योजनेच्या मान्यतेसाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्या प्रस्तावांची छाननी करुन परिपुर्ण प्रस्ताव योग्य त्या शिफारशीसह आयुक्तालयास सादर केले जातात. त्यानंतर जिल्हयांच्या आवश्यकतेनुसार उपलब्ध तरतुदीच्या अधिन राहून स्वयंसेवी संस्थेस अनुदान तत्वावर मान्यता देण्याचा निर्णय शासन स्तरावरुन घेण्यात येतो. | संबंधीत बाल कल्याण समिती<br><br>जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | राज्य सल्लागार मंडळ, व्दारा आयुक्त, महिला व बाल विकास ,२८-राणीचा बाग म.रा. पुणे-१<br><br>आयुक्त, महिला व बाल विकास, २८- राणीचा बाग म.रा. पुणे-१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सदर बालकाला संबंधित जिल्हयाच्या बाल कल्याण समितीसमोर हजर करू शकतात. बाल कल्याण समिती सदर बालकाच्या बाबतीत चौकशी करून सदर बालकाच्या पुनर्वसनाबाबत निर्णय घेते. बालगृहांची यांची व विहित अर्जाचा नमूना संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे व आयुक्तालयाच्या www.commisionerate.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. | | | |
| १९. | **शासकीय पुरुष राज्यगृह** | | | |
